**Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University,**
AURANGABAD -431 004 Maharashtra, India
NAAC Re-accredited 'A' Grade

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ
औरंगाबाद- ४३१ ००४ महाराष्ट्र, भारत
नॅक समिती तर्फे 'अ' दर्जा प्राप्त

P.G.Admission Unit
पदव्युत्तर प्रवेश विभाग

P.G. Office :- (0240) 2403123 WEBSITE : www.bamu.ac.in : http://bamua.digitaluniversity.ac E-mail : pgsection@bamu.ac.in

# पदव्युत्तर प्रवेश प्रक्रिया २०१८-१९ संबंधी विद्यार्थ्यांच्या प्रवेशाबाबत महत्वाचे परिपत्रक

महोदय / महोदया,

सर्व विभाग प्रमुख, शैक्षणिक पदव्युत्तर विभाग विद्यापीठ परिसर औरंगाबाद, सर्व विभाग प्रमुख, शैक्षणिक पदव्युत्तर विभाग उप-परिसर, उस्मानाबाद, मा. प्राचार्य, समाजकार्य महाविद्यालय, विद्यापीठ परिसर, औरंगाबाद व तसेच मा. प्राचार्य सर्व संलग्नीत महाविद्यालय (केवळ विज्ञान व वाणिज्य पदव्युत्तर अभ्यासक्रम) यांना मा. प्र-कुलगुरू यांचे आदेशाने कळविण्यात येते की, दिनांक ०४-०६-२०१८ पासून पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्ष प्रवेशासाठी प्रथम प्रवेश फेरी प्रक्रिया सुरु करण्यात येत असून याबाबत उक्त सर्व विभाग व महाविद्यालये यांना कळविण्यात येते की, आपल्या विभाग / महाविद्यालयामध्ये **पदव्युत्तर अभ्यासक्रमास प्रवेश घेतेवेळी विद्यार्थ्यांचा बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी. अंतिम वर्षाचा निकाल घोषित झाला नसेल तर तेव्हा अशा विद्यार्थ्यांना प्रोव्हिजनल प्रवेश देवून विद्यार्थ्यांकडून १०० रुपयाच्या बाँडवर ३० दिवसाच्या आत पास झाल्याबाबतचे गुणपत्रक व स्थलांतर प्रमाणपत्र (टीसी) सादर न केल्यास तो प्रवेश रद्द करण्यात येईल या अटीवर प्रवेश देण्यात यावा.**

तसेच जे विद्यार्थी आपल्या महाविद्यालयात केवळ Admitted प्रवेश घेऊ अशा विद्यार्थ्यांकडून केवळ १०० रुपये नोंदणी शुल्क (केवळ संलग्नीत महाविद्यालयांसाठी) घेऊन छायांकित प्रतवरच विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात यावा.

विद्यापीठ प्रांगण, औरंगाबाद. ][
पी.जी./प्रवेश/२०१८-२०१९/2351-2426 ][
परिपत्रक क्र. ८ ][
दिनांक ०७-०६-२०१८ ][

**प्रा. अशोक तेजनकर,**
प्र. कुलगुरू

**या परिपत्रकाची एक प्रत:-**

१) सर्व विभाग प्रमुख, सर्व शैक्षणिक पदव्युत्तर विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांना पुढील कार्यवाहीस्तव अग्रेषित.

२) सर्व विभाग प्रमुख, सर्व शैक्षणिक पदव्युत्तर विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ उप-परिसर, उस्मानाबाद यांना पुढील कार्यवाहीस्तव अग्रेषित.

३) प्राचार्य, सर्व संलग्नीत महाविद्यालये (केवळ विज्ञान व वाणिज्य शाखा), डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद. (जिल्हा- औरंगाबाद, जालना,बीड, उस्मानाबाद)

४) प्राचार्य, समाजकल्याण महाविद्यालय, विद्यापीठ परिसर, औरंगाबाद.

५) संचालक, युनिक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांना एक प्रत देण्यात येऊ विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उक्त परिपत्रक प्रकाशीत करण्यात येवून संबंधित महाविद्यालयाच्या लॉगिन आयडीमध्ये उपलब्ध करुन देण्यात यावे.

Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University ★ Aurangabad ★